K.A.A.N.M. Sonawane Arts, Comm. & Sci. College
SATANA 423301 NASHIK

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX | Issue - II | March - August - 2021

Marathi Part - II

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

OLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
DEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ** | ११८-१२२ |
| २६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर: स्वातंत्र, समता, बंधुता व न्यायाचा विचार करणारे महानायक<br>**प्रा. डॉ. प्रदीप रामकृष्णा राऊत** | १२३-१२५ |
| २७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार<br>**डॉ. मनिषा शंकर यादव** | १२६-१२९ |
| २८ | भारतीय स्त्रीयांचे मुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. सोनवले राजकुमार रंगनाथ** | १३०-१३५ |
| २९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक चळवळी<br>**कु. प्रियंका कि. जगदेवे** | १३६-१३९ |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार<br>**प्रा. यादव जे. बी.** | १४०-१४५ |
| ३१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता<br>**डॉ. एन. एल. गोंडाणे** | १४६-१५० |
| ३२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास<br>**प्रा. ए. बी. राऊत** | १५१-१५५ |

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com) 

# ३१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास

प्रा. ए. बी. राऊत
कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे महाविद्यालय, सटाणा, जि. नाशिक.

आज भारतामध्ये जे आधुनिकीकरण झालेले आहे. जे आधुनिकीकरणाचे वारे वाहत आहे. भारताने जी प्रगतिची शिखरे गाठलेली आहेत. त्यामागे अनेक राष्ट्र भक्तांचे, विचारवंतांचे योगदान महत्वाचे आहे. त्यामधील एक महत्त्वपूर्ण विचारवंत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. आंबेडकरांना 'नॉलेज ऑफ सिम्बॉल 'म्हणूनही ओळखले जाते भारताच्या जडणघडणीत त्यांच्या विचारांचा व कृतींचा मोठा वाटा आहे. त्यांच्या विचारांमुळेच भारतातील आधुनिकीकरण्याच्या वाटचालीस गती मिळाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**संशोधनाचा उद्देश**

आंबेडकरांच्या सामाजिक विचारांच्या योगदानाचा आढावा घेणे.

**स्त्री सक्षमीकरणासाठी चे योगदान**

आंबेडकरांनी स्त्री-पुरुष समानतेचा सुरुवातीपासूनच पुरस्कार केलेला होता. सामाजिक विकासासाठी स्त्रियांनाही विविध योजनांमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. असे आंबेडकरांचे मत होते. 1927 मध्ये त्यांनी महाड येथे स्त्रीयांसाठी सभा घेतली. स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या आवश्यकते साठी त्यांनी सप्टेंबर 1951 मध्ये महाबोधी या मासिकात हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनीती हा लेख प्रकाशित केला होता. 1944 मध्ये राव कमिटीने हिंदू कायद्याचे लेखन केले व तोच कायदा हिंदू कोड बिल म्हणून प्रसिद्ध आहे आंबेडकरांनी हिंदू कोड चार वर्ष अभ्यास केला व हिंदू कोड बिल लागू करण्यासाठी संसदेमध्ये आग्रह धरला. या कोड बिलाच्या निर्मिती मध्ये सुद्धा आंबेडकरांचा महत्त्वाचा वाटा होता. या बिलातील कलमांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला आंबेडकरांच्या विचारांची खोली लक्षात येते. या बिलात या घटकांचा समावेश होतो.

१. मालमत्तेच्या वारसाहक्क स्त्री-पुरुष दोघांनाही समावून घेणे
२. पुरुषांच्या आणि स्त्री उत्तराधिकारी बनेल
३. स्त्रियांची मालमत्ता अबाधित राहील तीन पत्ती नातेवाईक यांना उडवता येणार नाही
४. हुंड्याची रक्कम स्त्रियांच्या कामी यायला हवी
५. विवाह तून बाहेर पडण्यात पडण्यासाठी घटस्फोटाची तरतूद
६. द्विभार्या ला विरोध
७. मंदिरांमध्ये स्त्रियांना मुक्त प्रवेश

स्त्रियांच्या हक्काचा सगळ्यात मोठा शत्रू भेदभाव आहे असे आंबेडकरांचे मत होते त्यामुळे हक्कांची अंमलबजावणी योग्य प्रकारे व्हायची असेल तर भेदभाव नष्ट केला पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते. भेदभाव

नष्ट झाल्याशिवाय मूलभूत हक्कांना काही अर्थ नाही असे आंबेडकर म्हणत त्यासाठी त्यांनी 1913 मध्ये अत्यंत समाज कमिटीची स्थापना केली. या कमिटील तुळसाई फागुजी बनसोडे ही पहिली स्त्री सदस्य होती. या कमिटीचे काम सामाजिक व शैक्षणिक प्रगती घडवून आणणे होते तसेच शेड्युल कास्ट फेडरेशनचे सरचिटणीस पा. ना. राजभोज यांची पत्नी रुक्मिणीबाई त्यांच्या कन्या शांताबाई चव्हाण यांचाही मौलिक सहभाग होता. 1920 मध्ये नागपूर येथे भरलेल्या भारतीय बहिष्कृत परिषदेच्या अध्यक्षपदी शाहू महाराज होते. स्त्री शिक्षणासंबंधी तुळसाबाई बनसोडे व शांताबाई यांची भाषणे या परिषदेत झाली होती. 1938 मनमाड येथे रेल्वे अस्पृश्य कामगार परिषद भरली असताना तेथे महिला परिषद घेऊन त्यांनी तत्परता प्रासंगिकता आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली दाखवून दिली होती. 1942 ला नागपुर येथे अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद भरली होती. त्यातही महिलांचा सहभाग मोठा होता 1946 मध्ये पुण्याला पुणेकराला विरोधी महिलांनी सत्याग्रह केला होता हे सर्व सत्याग्रह किंवा आंदोलने सभा हे आंबेडकर यांच्या नेतृत्वामुळे निर्माण झालेली होती. सामाजिक न्याय बाबत आंबेडकरांचा विचार - आंबेडकरांच्या वर पाश्चिमात्य विचारसरणीचा मोठा प्रभाव होता. ते आधुनिक ते चे पुरस्कर्ते होते. त्यांच्या प्रत्येक विचारामध्ये समतेचा पुरस्कार केलेला आपल्याला दिसून येतो. त्यांच्या मते समता हा प्रत्येक मानवाचा अधिकार आहे. जन्मताच प्रत्येक व्यक्ती ही समान असते. त्यासाठी भारतीय राज्यघटनेतील कायदेशीर समानतेचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांनी कायदेशीर समानतेला महत्त्व दिले. त्याच बरोबर त्यांनी सामाजिक समानतेचा ही पुरस्कार केला. कायदेशीर समानतेच्या हक्कांचा उपभोग घेण्यासाठी सामाजिक व आर्थिक समता आवश्यक आहे असे आंबेडकरांचे मत होते. आर्थिक व सामाजिक लोकशाही असेल तरच राजकीय लोकशाही यशस्वी होईल असा सिद्धांत त्यांनी मांडला होता. राज्यघटनेची निर्मिती करत असताना आंबेडकरांनी आर्थिक व सामाजिक संस्कृती समानतेला मोठ्या प्रमाणात महत्त्व देते. त्यांनी समाजवादी सिद्धांतून सामाजिक तिची माडणी केली ज्या समाजामध्ये आर्थिक दरी मोठ्या प्रमाणात असते. त्या समाजामध्ये मोर्चे निघतात आंदोलने होतात. यातून सामाजिक वाद निर्माण होतो असे आंबेडकरांचे मत होते. त्यांनी सामाजिक दरी कमी करण्यासाठी मंदिरप्रवेश, जातीचा वरिष्ठ कनिष्ठ, पानवठा पद्धत इत्यादी वर मोठ्या प्रमाणात टीका केली. व ती नष्ट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी मनुस्मृती दहन, महाडचा सत्याग्रह, नाशिकचा सत्याग्रह .येवल्यातील गर्जना इत्यादींचा अवलंब केला.

मूकनायक बहिष्कृत भारत समता प्रबुद्ध भारत इत्यादी साप्ताहिके पाक्षिके चालविली. 1945 मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी मुंबई सिद्धार्थ महाविद्यालय आणि औरंगाबाद मध्ये मिलिंद विद्यालयाची स्थापना केली.

**डॉ.आंबेडकरांची शेतीविषयक विचार**

शेती हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांनी साडेसात वर्षे कोकणात शेतकऱ्यांचे आंदोलन चालवले. त्यातून जमीनदारी सावकारी बंद होण्यास मदत झाली. निवळ पारंपरिक शेतीवर शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह करणे शक्य नाही असे बाबासाहेबांचे ठाम मत होते. लहान लहान तुकडे झालेल्या शेती यांना योग्य

वाटत नव्हती. त्यासाठी त्यासाठी त्यांनी एक दोन शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेती केली पाहिजे असे ते म्हणत. आंबेडकरांच्या मते शेतकरी हा गरीब असतो. त्याच्याकडे शेतीला गुंतवणुकीसाठी पैसे नसतात. अवजारांच्या खरेदीसाठी पैसे नसतात. सिंचनाच्या सुविधा तो मोठ्या प्रमाणात करू शकत नाही. विजेचे दर त्याला परवडत नाही. त्यादृष्टीने शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे असे आंबेडकरांचे मत होते. त्यासाठी आंबेडकरांनी त्रिसूत्री ही सुचवली होती.

१. शेतीसाठी लागणारे अवजार आधुनिक असली पाहिजे पारंपरिक पद्धतीने शेती कधीच समृद्धी आणू शकणार नाही.
२. आधुनिकीकरणासाठी जमिनीच्या छोट्या छोट्या तुकड्यांचे एकत्रीकरण होणे गरजेचे आहे.
३. शेतीला दर्जेदार बियाण्याची गरज आहे. त्याशिवाय शेती चांगली होऊ शकत नाही.

आंबेडकरांच्या मते या तीनही गोष्टी सरकारने शेतकऱ्यांना पुरवले पाहिजे

आंबेडकरांनी शेतमालाला हमीभाव देण्याचाही आग्रह धरला त्यांनी सूचना 1944 मध्ये केली होती ती आजही आपल्याला महत्त्वाची वाटते दुष्काळ परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी वनीकरणला प्राधान्य दिलेले आहे. आंबेडकरांनी शेतीसाठी पाण्याची आवश्यकता गरज ओळखली होती. आणि शेतीच्या विकासासाठी शाश्वत पाणी पुरवठ्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजन झाले पाहिजे देशात घडणाऱ्या दुष्काळ हे मानवनिर्मित आहे. दुष्काळ हटवायचा तर दुष्काळात पाण्याचे नियोजन करावे जिरायती शेती बागायती करण्याचे प्रयत्न वाढवले पाहिजेत असे आंबेडकरांचे मत होते. आंबेडकर केवळ पाण्याबाबत मत व्यक्त करून थांबले नाहीत तर त्यांनी ब्रिटिश सरकारला नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली. योजना दामोदर खोरे योजना म्हणून ओळखली जाते आपल्या शासनाने 1996 मध्ये कृष्णा गोदावरी, तापी नर्मदा, अशी खोरे यांची विभागणी केली यावरून बाबासाहेबांचे यांच्या दूरदर्शीपणा ची लांबी व खोली लक्षात येते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांचा पहिला संप 1928 ते 1934 या दरम्यान रायगड जिल्हयातील सरी या गावात घडवून आणला हा संप तब्बल सात वर्षे चालला गरीब दरिद्री शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी १९२८ पासूनच डॉक्टर आंबेडकर यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले होते. २८ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्हयातील शेतकरी परिषद चिपळूण येथे आयोजित करण्यात आली होती .या शेतकरी परिषदेचे अध्यक्ष आंबेडकर होते त्यांनी शेतकऱ्यांचे कोकणातील खोती विरुद्ध आंदोलन उभारले १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधिमंडळात मांडले होते.

आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार

डॉ. आंबेडकर यांनी आपल्या विचारांमध्ये शिक्षणाला अत्यंत महत्व हे दिलेली आहे. त्यांच्या मते दलितांच्या अधोगतीस कारणीभूत त्यांना नमिळालेले शिक्षण हे आहे. आंबेडकरांनी शिक्षणापासून वंचित असलेल्या दलित समाजाच्या शिक्षणासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली एखाद्या समाजाला किंवा व्यक्तीला शिक्षण नाकारणे म्हणजेच त्या व्यक्तीचे माणूस म्हणून अस्तित्व नाकारणे असे आहे असे आंबेडकरांचे मत होते.

औरंगाबाद मध्ये मिलिंद महाविद्यालयाच्या शिलाण्यास प्रकरणी बोलताना बाबासाहेब म्हणाले की मी हिंदू समाजातील खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे मी जाणतो खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येत आहे पण ती चूक आहे असे ते म्हणत . दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांना अन्न वस्त्र निवारा यांची सोय करणे हे त्यांना मान्य नव्हते. तर त्यांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये सामाजिक जाणिवा निर्माण करणे महत्त्वाचे आहे असे आंबेडकरांचे मत होते. उच्च शिक्षणातून स्वातंत्र्य समता बंधुता ही मानवी मुल्ये त्यांच्या मनामध्ये रुजवणे आवश्यक आहे असे आंबेडकर मानत ते शिक्षणाचा आग्रह धरताना असे म्हणतात की विद्यापीठाच्या प्रतिनिधी सभेत समाजातील सर्व वर्गांना स्थान हे मिळाले पाहिजे. तरच समाजातील सर्व वर्गाला शिक्षण मिळू शकते समाजातील ज्या उच्चवर्गीय सुशिक्षित वर्ग आहेत ते तळागाळातील लोकांच्या समस्या सोडवतील यावर आंबेडकराचा विश्वास नव्हता म्हणून त्यांनी तळागाळातील प्रतिनिधित्व शिक्षण क्षेत्रामध्ये असणे कसे गरजेचे आहे प्रतिपादन केले. आंबेडकरांनी शिक्षणाचा पायाभूत विचार करताना ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही त्यांच्यासाठी शिक्षण हा सक्तीचा कायदा असावा असे म्हटले आहे. त्यांच्या मते शिक्षण हे सर्वांसाठी मोफत न ठेवता जे फी देऊ शकतात त्यांच्याकडून ती घ्यावी म्हणजे सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागवता येईल असे ते म्हणतात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मदत म्हणून शिष्यवृत्ती देण्यात यावी असेही त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. ते पुढे म्हणतात की विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती चा गैरफायदा पालकांकडून व विद्यार्थ्यांकडून घेतला जातो. त्यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न देता वसतिगृहाची सोय करावी असे ते सांगतात. केवळ अक्षरओळख शिकवणे म्हणजे शिक्षण नव्हे तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी १९ जून १९५० रोजी औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालयाची रूपाने मराठवाड्यात उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. बाबासाहेब खऱ्या अर्थाने शिक्षण तज्ञ होते त्यांनी आपल्या महाविद्यालयास सिद्धार्थ महाविद्यालय मिलिंद महाविद्यालय असे नाव दिले औरंगाबादच्या ५० एकर विस्तीर्ण परिसरात नागसेवन नाव दिले. ही पण सिद्धार्थ मिलिंद नागसेवन ही नावे लोकशाही विचार स्वातंत्र्य चिकित्सा प्रामाणिक बुद्धिवादी वादाची प्रतीके आहेत. खरे पण बाबासाहेब या महाविद्यालयास स्वतःचे किंवा त्यांच्या आई वडिलांचे नाव देऊ शकले असते. पण त्यांनी ते टाळले सामाजिक बांधिलकीतून त्यांनी ही नावे दिली आणि यातूनच आजच्या काळामध्ये चालेल शिक्षणातील अराजकता आणि त्याच्या वरती असणारे बाबासाहेबांचे विचार किती महत्त्वाचे आहे हे लक्षात येते.

आंबेडकरांनी आपल्या विचारांमध्ये इतर मागासवर्गीय यांचाही विचार केला होता त्यासाठी त्यांनी राज्यघटनेमध्ये ३४० व्या कलमात तरतुदी केलेली दिसून येते. त्यांनी त्यांच्या विचारांमध्ये ओबीसीच्या आरक्षणाचा मागणीही धरलेली होती आर्थिक सांस्कृतिक धार्मिक व शैक्षणिक मागासलेपण जाऊन ओबीसींची संपन्नता समृद्धी लाभावी असे त्यांचे मत होते ओबीसींची होणारे शोषण हे थांबले पाहिजे ओबीसीमध्ये स्वातंत्र्य समता बंधुता ही तत्वांचा विकास झाला पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते.

निष्कर्ष

१. आज आंबेडकरांच्या विचारांची भारताला खऱ्या अर्थाने गरज असलेली दिसून येते आज स्त्रियांवर होणारे अत्याचार स्त्रियांना कमी लेखणे, त्यांना विविध ठिकाणी संधी नाकारणे इत्यादी मोठ्या प्रमाणात चाललेले दिसून येते. यावरती उपाय म्हणून आंबेडकरांची विचार किती महत्त्वाचे आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

२. आज भारतामध्ये स्वातंत्र्याला ७५ वर्ष होऊन सुद्धा सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकलेला नाही. आज अनेक जातीचे धर्मांचे समूह आरक्षणाची न्याय हक्काची मागणी करताना दिसून येतात. भारतातील मागासलेल्या प्रदेशात देशविघातक कृतींची वाढ झालेली आपल्याला दिसून येते यावरती उपाय म्हणून आंबेडकरांची सामाजिक न्यायाची संकल्पना महत्त्वाची ठरते.

३. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार ही महत्त्वाचे आहेत त्यांनी शेतीसाठी पाण्याला दिलेले महत्व आधुनिक बि -बियानाचा पुरवठा सरकारने करण्याची मागणी आज भारतामध्ये वाढलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हमी भावासाठी चाललेले दिल्लीतील आंदोलन यावरती उपाय म्हणून आंबेडकरांच्या शेतीविषयक विचार महत्त्वाचे ठरतात

४. आज भारतात शिक्षणपद्धतीमध्ये चाललेला गोंधळ शिक्षण समाटांची झालेली निर्मिती शिक्षणाकडे एक उद्योग म्हणून पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन स्वतःची घराणेशाही शिक्षणावर ती निर्माण करू पाहणारी व्यवस्था यावरती उपाय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिक्षण विषयक विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

संदर्भसूची

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताला महासत्ता बनवण्यासाठी वैचारिक योगदान-- अथर्व पब्लिकेशन जळगाव

२. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल --चांगदेव खैरे बांडे

३. महाराष्ट्र टाईम २० एप्रिल २०२१

४. महाराष्ट्र टाईम ११ एप्रिल २०२१

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १